# कामधेनू दत्तक ग्राम योजना.

सन 2013/14 या वर्षामध्ये कामधेनू योजना हि योजना राबविणे प्रस्तावित केले असुन,सदरचे योजनेतून 122 गावाची निवड करणेसाठी खालील निकष आहेत.

- गावची निवड करतांना सदरचे गाव दुध संकलन केंद्राच्या मार्गावरील असावे.
- निवड केलेल्या गावात पैदासक्षम गायी म्हैशींची संख्या किमान 300 असावी.तथापी पशुवैद्यकीय संस्थांच्या कार्यक्षेत्रातील ज्या गावांमध्ये दुधाळ जनावरांची संख्या सर्वात जास्त असेल त्या गावाची प्राधान्याने निवड करावी.
- ज्या गावातील सरपंच, ग्रामसेवक तसेच दुध संस्थांचे पदाधीकारी यांचा सक्रीय सहभाग मिळत असलेल्या गावांना प्राधान्य द्यावे.
- सदरच्या योजनेतील गावांची निवड जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचे अध्यक्षतेखालील सनियंत्रण समिती मार्फत करणेत यावी.

सदरचे योजना लातुर जिल्हा परिषदे अंतर्गत कार्यरत असलेल्या पशुवैद्यकिय दवाखान्याचे कार्यक्षेत्रातील 122 गावांमध्ये प्रति गाव रक्कम रु.1.52 लक्षचे मर्यादेत खालील बाबीवर करणेत येईल.

| अ.क्र. | बाब. | मर्यादा. |
|---|---|---|
| 1. | पशुपालक मंडळ स्थापन करणे व सहलींचे आयोजन करणे. | रु.7000/- |
| 2. | जंतनाशन शिबीरे. | रु.17500/- |
| 3. | खनिज द्रव्य मिश्रण व जिवनसत्वे पुरवठा. | रु.40000/- |
| 4. | गोचिड गोमाशा निर्मुलन शिबीर. | रु.13000/- |
| 5. | वंध्यत्व निदान व औषधोपचार शिबीर. | रु.22000/- |
| 6. | वैरण विकास कार्यक्रम. | रु.17000/- |
| 7. | निकृष्ट चारा सकस करणे इत्यादी. | रु.5000/- |
| 8. | प्रसिद्धी व प्रचार. | रु.21000/- |
| 9. | नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे. | रु.5000/- |
| 10. | जनावरांचे मलमुत्र व वाया गेलेल्या चाऱ्याचे खत व्यवस्थापन करणे<br>प्रशिक्षण व प्रात्यक्षिक. | रु.5000/- |
|  | **एकूण.** | **1,52,500/-** |